
Arts and Commerce College, [illegible]
Est. 1991
Tal. Khatav, Dist. Satara

14

ISSN 2231-573X



# शिक्षण

वर्ष : ९ वे, अंक : ३ रा, ऑक्टोंबर ते डिसेंबर – २०१८

# अनुक्रम


* गुण गाईन आवडीच्या निमित्ताने ........ ३
  – *नागनाथ कोत्तापल्ले*
* रणांगणावर ललकारणारी कविता ........ ११
  – *डॉ. जनार्दन वाघमारे*
* नव्या कथेचा सांगावा ........ १७
  – *प्राचार्य डॉ. सयाजीराजे मोकाशी*
* संत साहित्यातील कृषी संस्कृतीचा घेतलेला शोध ........ २२
  – *प्रा. बाबुराव उपाध्ये*
* 'आभाळवाटा' : मानवमुक्तीचा सम्यक जाहीरनामा ........ २५
  – *प्रा. मीनल येवले*
* 'अंदमानचा प्रवास' च्या निमित्ताने ... ........ २९
  – *देवीदास शिंदे*
* स्त्रीमनाचा मुक्त संवाद : 'सामर्थ्य आहे तुझ्यातही' ........ ३४
  – *प्रा.डॉ. संतोष चव्हाण*
* वंचितांच्या वेदनांचा डोळस ताळेबंद : 'फेसाटी' ........ ३८
  – *प्रा. बी. एन. चौधरी*
* डोळस जीवन जगणारा माणूस ........ ४४
  – *प्रा. शिवाजी वाठोरे*
* पांडा तात्या ........ ५०
  – *अंकुश गाजरे*
* 'आई! मला जन्म घेऊ दे' ........ ५७
  – *प्रा. वा. ना. आंधळे*
* शेतकरी डिजिटल झाले (कविता) ........ ६१
  – *कवी अर्जुन देशमुख*


Arts and Commerce College ... Est. 1991 ... Tal- Khatav, Dist. Satara

## गुण गाईन आवडीच्या निमित्ताने...

**– नागनाथ कोत्तापल्ले**

कुलगुरुपदासह विविध शासकीय उच्च पदांवर काम करुनही अत्यंत सत्शील राहिलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे प्रा. के. पी. सोनवणे हे होत. त्यांच्याएवढे सत्शील, विनम्र व अभ्यासू व्यक्तिमत्त्व मी दुसरे पाहिले नाही. जेव्हा जेव्हा त्यांची भेट होते, तेव्हा तेव्हा त्यांचे हे व्यक्तिमत्त्व अधिकच तीव्रतेने जाणवून जाते आणि भोवतीच्या चंगळवादी काळातही प्रा. के. पी. सोनवणे कसे बदलले नाहीत, असा प्रश्न माझ्या मनात उभा राहतो. त्याचे उत्तर 'गुण गाईन आवडी–अर्थात गुरुवर्य भगवानबाबा महिमा' हे पुस्तक वाचल्यानंतरच मिळते. प्रा. के. पी. सोनवणे संत भगवानबाबा यांच्या सहवासात बालपणापासूनच आले आणि आमूलाग्र बदलून गेले. त्यांच्यामध्ये कर्मकांडांच्या पलीकडे जाण्याची एक आगळीवेगळी आध्यात्मिक वृत्ती रुजली. जीवनातील श्रेष्ठ मूल्यांचे ते उपासक




बनले. ते खरेखुरे वारकरी झाले. म्हणूनच एका वारीच्या प्रसंगी भगवान बाबांनी त्यांना प्रवचनासाठी बोलाविले आणि त्यांचे 'सोनूमामा खांबेकर' असे नामकरणही केले. प्रा. के. पी. सोनवणे हे बीड जिल्ह्यातील खांब्याचे, म्हणून खांबेकर, सोनोपंत दांडेकरांच्या नावाशी साम्य असणारे हे नामकरण म्हणजे प्रा. के. पी. सोनवणे यांचा आध्यात्मिक क्षेत्रातील अधिकार भगवानबाबांनी ओळखला होता असे म्हणावे लागते. भगवानबाबांनी दिलेले हे वेगळे नाव आजही प्रा. सोनवणे यांनी आपल्या मनामध्ये आदराने जपून ठेवले आहे. त्याचे कारणच मुळी भगवानबाबांमुळे त्यांचे समग्र जीवन आणि जाणिवा

घेऊनच ती वावरते. 'क्रांतिकारी कविते' या कवितेत आपल्या कवितेला उद्देशून कवी म्हणतो –

*हे क्रांतिकारी कविते*
*तुला युगवात पेटवायची आहे*
*ही भारत भूमी समतेच्या*
*मंत्राने नटवायची आहे!*
*विषमतेची अभद्र रेषा*
*नकाशावरून मिटवायची आहे!*

आणि हाच या कवीचा संदेश व जाहीरनामा आहे. त्याच्या कवितेने दिलेले हे अभिवचन आहे. माणसाने माणसाशी माणसासारखे वागावे, हेच त्या जाहीरनाम्यातले एक महत्त्वाचे कलम आहे.

(साभार : दै. पुण्यनगरी)

***



Arts and Commerce College, Mayani
Est. 1991
Tal-Khatav, Dist. Satara

## नव्या कथेचा 'सांगावा'

**– प्राचार्य डॉ. सयाजीराजे मोकाशी**

**भा**रतातील बहुसंख्य लोक खेड्यांत राहतात, 'निसर्गाकडे चला' या महात्मा गांधीच्या आवाहनास प्रतिसाद देऊन अनेक शहरवासी लोक निसर्गाकडे वळाले. खेड्यांतील खूप मोठे जग अजूनही साहित्याचा विषय झाले नव्हते. तेथील शेती, निसर्ग, जीवन पद्धती आकारास आलेली समाजरचना आणि त्यात पिढ्यानपिढ्या जीवन जगणारा माणूस साहित्याच्या केंद्रस्थानी आला आणि ग्रामीण साहित्य उदयास आले.




स्वातंत्र्य प्राप्तीसाठी सुरू असलेली देशव्यापी चळवळ आणि ग्रामीण भागातील शिक्षण प्रसार यामुळे देशभर समाज जागृती होऊ लागली. स्वातंत्र्यानंतर व्यक्ती स्वातंत्र्याला महत्त्व आले. राज्यघटनेने जन सामान्यांना मोठेपणा, सन्मान बहाल केला. यांतूनच ग्रामीण साहित्याच्या निर्मितीला मोठा आधार प्राप्त झाला. हरिभाऊ आपटे, वि. स. सुखटणकर, लक्ष्मणराव सरदेसाई, ग.ल.ठोकळ, ग.ह.पाटील, बहिणाबाई चौधरी, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, आनंद यादव, रा.रं. बोराडे, द.ता. भोसले, चारुता सागर, भास्कर चंदनशिव आदी लेखकांचे ग्रामीण साहित्य सुप्रतिष्ठित झाले. निसर्ग, कृषिनिष्ठा, गावगावाडा, ग्रामीण बोली, ग्रामीण कुटुंब व्यवस्था, ग्रामसंस्कृती, आदिमतेकडे झुकणारा कल आणि प्रादेशिक बोली ही ग्रामीण साहित्याची वैशिष्ट्ये सांगितली जातात.

स्वराज्यप्राप्तीनंतर लोकशाही जीवनात खूप मोठे बदल घडले. शेतीचे आधुनिकीकरण, शिक्षणाचा वाढता प्रसार, सरकारी योजनांची घोषणा, कर्ज माफी, मानवी मूल्यांची मोडतोड, यंत्रयुगातील मानवाचे क्षुद्रत्व, वाढत गेलेला दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती, पैसा व गुंडगिरीची मदत घेऊन लढलेल्या निवडणुका आणि बदलत्या मानसिकतेमुळे कर्जबाजारीपण यामुळे पारतंत्र्य आपल्या दाराशी आलेले जाणवते.

ही बदलती ग्रामीण व्यवस्था साहित्यातून जाणवते. गेल्या पन्नास–साठ वर्षांत ग्रामीण कथेत विविध प्रवृत्ती दिसून येतात. असे डॉ. कृष्णा इंगोले म्हणतात.

१) वास्तव परिस्थितीच्या संदर्भात ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारी प्रवृत्ती.
२) ग्रामीण माणसांच्या मनांचा आणि नाते संबंधांचा शोध घेणारी प्रवृत्ती
३) दलित, भटक्यांच्या जीवनानुभवांचे चित्रण करणारी प्रवृत्ती
४) मनोरंजनात्मक विनोदी किस्सा प्रवृत्ती

ग्रामीण जीवनाचे चित्रण करणाऱ्या प्रवृत्तीमध्ये पुढील विशेष जाणवतात. आपल्या प्रदेशाचे, जीवननुभवांचे, लोकजीवन परंपरेचे आणि बोलीचे वेगळेपण स्पष्टपणे जाणवते. पारंपारिक खेड्यांत होत गेलेला बदल व्यक्त होतो. व्यक्तीच्या मनोदर्शनाबरोबरच सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थितीच्या चित्रणावर लेखकाचा भर असतो. त्यात दुःख, दैन्य, दारिद्र्य, शोषण आणि विद्रोह प्रगटतो. निवेदनासाठी प्रमाणभाषा आणि संवादात बोलीभाषा व्यक्त होते. यामध्ये प्रामुख्याने व्यंकटेश माडगूळकर, मधु मंगेश कर्णिक, रणजित देसाई, बी. रघुनाथ, बाबा पाटील, चंद्रकुमार नलगे, चारुता सागर, आनंद यादव, द. ता. भोसले, बा. ग. केसकर, भास्कर चंदनशिव, राजन गवस, सोपान हळमकर यांचा समावेश होतो.

या प्रकारातील कथांत व्यक्तिरेखांना उठाव देण्यासाठी प्रदेश आकार धारण करीत नाही. तर समृद्ध जीवनानुभवांतून त्या प्रदेशाची रेषन रेष लेखक प्रभावीपणे शब्दांत आणतो. बदलती मानवी प्रवृत्ती, मूल्यांची पायमल्ली आणि नातेसंबंधातील मनोविश्लेषण वास्तवाच्या पातळीवर, बोलीच्या सहज वापरातून साजिवंतपणे हा अनुभव वाचकांच्या अंतःकरणाला भिडतो, याच जात–कुळीतील अस्सल नवकथाकार सचिन पाटील हे एक होत. त्यांच्या 'सांगावा' या कथासंग्रहाचा हा थोडक्यात परामर्श.

सचिन पाटील यांच्या कथा ग्रामजीवनातील वास्तवाचे प्रत्यकारी चित्रण करतात. कथा तंत्राचा फारसा विचार न करता, आपल्या जीवनानुभवांशी प्रामाणिक राहून, आशयाला बोलते करीत त्यांची कथा आकारास आली आहे.

कृषी जाणीव व्यक्त करताना त्यांच्या कथेत ग्रामीण जीवनाचे प्रभावी दर्शन



and Commerce College Est. 1991

घडते. 'सांगावा' कथेतील सखू म्हातारी येसाबरोबर बोलताना मळ्यातल्या वाटेने चालते 'काळीज' कथेतील शामूअण्णा काळ्या आईला काळाप्रमाणे जपायचा प्रयत्न करतो. आपल्या अनेक पिढ्यांचे पोट ज्या काळ्या मातीने भरले, तिला तो विकू इच्छित नाही. पांडबाचा ऊस कारखान्याला-वेळेत जावा यासाठी त्याचा आटापिटा 'वाट' या कथेत येतो. 'सय' कथेतील रावबा शेतात राबणारा शेतकरी आहे. 'चकवा' कथेतील सर्वच वर्णने मळ्याच्या वाटेची आणि अंधारात दडपलेल्या साजिवंत पिकांची आहेत. 'भूल' कथेतील हणमा कष्टाळू शेतकरी आहे. याशिवाय 'पावना','धग' कृषिजीवनाशी संबंधित आहेत.

प्रभावी व्यक्तिरेखांमध्ये सखू म्हातारी, उपवर मुलीसारख्या वयात आलेला ऊस साखर कारखान्याला घालावा म्हणून गाढवांना गोपाळशेठ म्हणणारा आगतिक पांडबा, आपल्या मळ्याला नि घराला भूल पडांयला नको म्हणून फळाला आलेला वांग्याचा फड रातोरात स्वतः उपटून टाकणारा हरण काळजीचा हणमा आणि कथेत नसणारा पण जिवाला घोर लावणारा रावबाचा सात वर्षाचा निरासग संतू ही पात्रे वाचकांच्या लक्षात राहतात. अत्यंत प्रभावी आणि नेमकेपणाने व्यक्तिरेखांचे सहज सुंदर वर्णन कथेला मोठेपणा देते. पुरुषप्रधान कथा हे या कथांचे आणखी एक वैशिष्ट्य मानावयास हरकत नाही.

या कथांमध्ये प्राणीही येतात. 'पावना' कथेतील सावळ्या बैलाला, गोठ्यात झोपलेला पावना अपरात्री सोडून नेत नाही. कारण तो पण हाडाचाच शेतकरी आहे. 'मांडवझळ' कथेतील लाली कुत्री मध्यमवर्गीय कुटुंबातील आहे. तिचे आजन्म परावलंबी जगणे अल्पाक्षरातून कथाकार रंगवितात 'वाट' कथेत पांडबा दावणीची शेरडी विकतो 'सांगावा' कथेत पयलारू म्हैस विते.

या कथासंग्रहात बदलत्या समाज जीवनाचे दर्शन घडविणाऱ्या समकालीन कथांचे वेगळेपण जाणवते 'काळीज' म्हणजेच आपली जमीन समजणारा शामूअण्णा आणि सेझच्या मोहात अडकत निघालेला निघालेला मुलगा सदू यांच्यातील नव्या काळाने निर्माण केलेला जीवघेणा संघर्ष हाडामांसाच्या शेतकरी वाचकाला अस्वस्थ केल्याशिवाय राहत नाही. खता मुतानं पोसलेली, मळीला पाडबानं लावलेली ऐंशी एकरांची ऊस लागण कारखान्याला लवकर जावी म्हणून तो अनेकांची मनधरणी करतो. ऊस तोडकरी, स्लिपबॉय, शेजारचा संधीसाधू मोठा शेतकरी आणि शेतकऱ्यांच्या मालकीचा असणारा साखर कारखानाही या पांडबाच्या शोषणात सहभागी होतो. नव्या युगातील नवे शोषण कथाकार अत्यंत बारकाईने मांडतात. ऊस कारखान्याकडे न्यायला वाट न देणारा

पाटील तर दुसऱ्या बाजूला सैरभैर झालेला, नाईलाजाने उसाला वाट दाखविणारा, मोडून पडलेला पांडबा या नव्या व्यवस्थेचा नवा बळी आहे. राजरोसपणे राजकारण करून बळीराजाला पिढ्यान पिढ्या कण्हत ठेवणे हे धोरण नवे राहिलेले नाही.

ग्रामीण जीवनाशी संबंधित परंतु वेगळ्या आशयाच्या काही कथा येतात.'धग' ही कथा संबाच्या मनाची धग मूकपणे व्यक्त करते. त्याला भारीही धगच देते आणि छळतेही तीच धग 'मरणकळा'मधील वाघमारे सर पत्नी सरूच्या आक्रस्ताळेपणाचे मानसिक बळी ठरतात. तर 'ओझं' कथेतील साहेब आपलाच आहे हे समजल्यावर अख्ख्या गावाला त्याचे कौतुक वाटते.

सचिन पाटील यांची कथा निवेदनाची भाषा हे कथेचे एक अंगभूत वैशिष्ट्य ठरते. कथारचना, शब्दसामर्थ्य आणि अचूक प्रतिमा यांचा चांगला मेळ दिसून येतो, निवेदन काही प्रमाणात भाषेत येते तर संवाद बोली भाषेतून व्यक्त होतात. दुपारी उनाची सावली आपसूक पायातळी पडावी तशी त्यांची निवेदनाची शैली कथानकाला बघता–बघता आकार देते. त्यांची नदीकाठची सांगली–कोल्हापूरची जैनी बोली कथेतील वातावरण जिवंत बनविते. परिणाम साधणारी छोटी वाक्ये, क्रियापद नसणारी वाक्ये, वाक्प्रचार, म्हणी, प्रादेशिक वैशिष्ट्यपूर्ण शब्द कथेला उभारी देतात.

प्रादेशिक शब्द हे त्यांच्या कथांचे सर्वात मोठे सामर्थ्य ठरते. घबक्यात, गटळं, शिजन, खरटं, हबक, बाटूक, घटलट, डबान, गटळी, काकाळू, कडपी इत्यादी शब्द येतात.

उघड्या बोडक्या जमिनी धापा टाकत हुत्या..
सुगीचा योट चाललेला..
भाकरीचा पिट्टा घुमविला..
जाळीत अडकलेल्या माशीगत गत झाली..
पाण्यात दगड टाकल्यागत गपगार..
जेवताना बोलणं तोंडी लावू लागली..

इत्यादी वाकसंप्रदाय, प्रतिभा रचनेचे सौष्ठव लेखणीतून स्पष्ट करताना दिसतात. त्यांची कथा निवेदनाप्रमाणेच संवादातून गती घेताना दिसते. त्यामुळे आशयाला संपन्नता येते. भाषेचा मुक्त आविष्कार कथेला लय प्राप्त करून देतो.

असे असले तरी त्यांच्या कथांमध्ये काही मर्यादाही जाणवतात. कथाकार दमदार कथाबीजे शोधतात आणि लिहितात. परंतु हुबेहूब उभा केलेला प्रसंग निर्मितीचा फायदा कथेला होत नाही. कथा सूचकतेने ते मांडत नाहीत. त्यामुळे काही ठिकाणी विसंगत



वाटते.

तरीही प्रभावी प्रसंग निर्मिती, कथांचे प्रसंगानुरूप प्रभावी प्रारंभ व [illegible] शेवट, समकालातील नव्या आशयाच्या दमदार कथा, व्यक्ती दर्शनासाठी ग्रामीण जीवनाचा चपलख वापर, कथा आशयाला अभिव्यक्त करणारी [illegible] आणि जेनी बोलीचा आशयानुरूप वापर हे कथेला एका उंचीवर नेतात.

जो कथाकार गेली काही वर्षे अंथरूणावर पडून जिद्दीने अनुभव संपन्न कथा लिहितो, आघातातही पुन्हा सावरतो, हाताल लेखणी घेतो आणि सशक्त धडधाकट माणूस नावाच्या वाचकाला स्तिमित करतो, यातच त्यांच्या कथांचे मोठेपण सामावलेले आहे. त्यांच्या कथांतील दोष सामान्य आहेत. मुळातच कथाकाराची कथा पाटील कुळातील असून, तिला खानदानी ऐट आहे. शालीनता आहे आणि अनुभवांचा जोरकसपणाही आहे. हा जोरकसपणा भविष्यातील मराठी कथेला संपन्नतेच्या उंचीवर नेईल यात शंका नाही.

त्यांच्या मूळच्याच दमदार वाटचालीला माझ्या हार्दिक शुभेच्छा!

***